# विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास केल्यास विकासाच्या खुप संधी

– प्रा.डॉ. सचिन चव्हाण

वाणिज्य विद्याशाखेतील प्रत्येक विषय महत्वपुर्ण असुन प्रत्येक विषयात अर्थ आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास केल्यास विकासाच्या खुप संधी उपलब्ध आहेत. नव्या तंत्रज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेउन उद्योग, व्यवसाय, व्यापार क्षेत्रात योगदान द्यावे असे आवहन पुणे येथिल प्रा.डॉ. सचिन चव्हाण यांनी महाविद्याल्यातील वाणिज्य व नियोजन मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात केले.

महाविद्यालयातील वाणिज्य व नियोजन मंडळाच्या माध्यमातून तृतिय वर्ष वाणिज्य व अर्थशास्त्र वर्गातील विद्यार्थ्यासाठी विकासाच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन दि. 19 जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालात केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डी.एस. पाटील होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक मंडळाचे सदस्य डॉ.शरद काठोके यांनी केले.उपस्थितांचे स्वागत नियोजन मंडळाचे अध्यक्ष श्रीमती कोटेचा, प्रा.डॉ. पी.एस.महाले डॉ.सुरेश वराडे यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले त्यास डॉ.चव्हाण यांनी समर्पक उत्तरे दिलीत.

कार्यक्रमास महाविद्यालयातील वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









